# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : **www.unipune.ac.in**
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : सीसीओ /२४८०

दिनांक : १९/११/२०१५

मा. अध्यक्ष / सचिव
सर्व अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व
शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये / संस्था
पुणे / अहमदनगर / नाशिक

विषय : वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची पदे नियमित स्वरूपात भरणेबाबत...

संदर्भ : १) शासन पत्र जा.क्र. ससं/उशि/पुवि/प्राचार्य/रिक्त पदे/आढावा/२०१५/१५५९, दि. ७ नोव्हेंबर, २०१५
२) शासन पत्र जा.क्र. अमवि/२०१५/प्राचार्यरिक्तपदे/मवि-२, दि. १० नोव्हेंबर, २०१५

महोदय/महोदया,

दि. १५ मार्च, २०१२च्या शासन निर्णयास अनुसरून काही महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना एका वर्षासाठी प्राचार्यांचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच विद्यापीठाच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावास अनुसरून महाविद्यालयांना दोन वर्षे अथवा दोन वेळा प्राचार्य पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यास मान्यता दिलेली आहे व त्यांचीही मुदत संपुष्टात येत आहे. महाविद्यालयाच्या दैनंदिन प्रशासनाची जबाबदारी प्राचार्यांची असल्याने प्रशासकीय व गुणात्मक दर्जा वाढीसाठी प्राचार्य पदी अर्हताधारक नियमित प्राचार्य असणे अनिवार्य आहे.

सोबत उपरोक्त संदर्भीय शासन पत्र जोडलेले असून त्यातील आशय स्वयंस्पष्ट आहे. सदर पत्रास अनुसरून आपल्या महाविद्यालयांतील प्राचार्यांची पदे मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्र. २२१६/२००६ मध्ये दिलेल्या आदेशानुसार प्राचार्य व अधिव्याख्यात्यांची पदे नियमित स्वरूपात भरण्यासाठी या विभागात निवड समितीसाठीचे प्रस्ताव सादर करून लवकरात लवकर कार्यवाही करावी.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं.)

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे-१

फोन नं.०२०-२६१२७८३३/२६०५१६३२ Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info फॅक्स नं. ०२०-२६०५२६३२

मा.कुलगुरू यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक 9 NOV 2015
आवक क्रमांक व्हीसी 6892
जावक दिनांक 16/11/15

जा.क्र.ससं/उशि/पुवि/प्राचार्य/रिक्त पदे/आढावा/२०१५/1559 दिनांक ०७.११.२०१५

17 NOV 2015

**अ त्यं त म ह त्वा चे**

प्रति,

१) मा.कुलगुरु,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

**पुणे ४११ ००७.**

BCUD 9/11/15

Director BCUD Office
Savitribai Phule Pune University
In.Dt. 16 NOV 2015
Inward 4303
Outward Date 17/11/15

२) प्राचार्य/प्राचार्या,

सर्व अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित

कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,

**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

ACADEMIC SECTION
Savitribai Phule Pune University
Date 17 NOV 2015
Inward No 13462

**विषय:- वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची पदे नियमित स्वरुपात भरणे बाबत...**

संदर्भ:-१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण २००९/(४३५/०९)/विशि-३, दि.३० जानेवारी, २०१०.

२) मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील क्र. एनजीसी/२०१५/प्राचार्य/मवि-२-३/१०७४१, दि.२१ ऑक्टोबर, २०१५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) पुणे विभाग पुणे या विभागाच्या अखत्यारीतील अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये कार्यरत असलेल्या प्राचार्यांचा तपशिल संदर्भ क्र.२ नुसार प्राप्त झाला आहे. यामध्ये विभागातील अनुदानित वरिष्ठ कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,

शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची संख्या १६७ असून पैकी ४१ महाविद्यालयांतील प्राचार्य प्रभारी व अतिरिक्त कार्यभार असल्याचे दिसून आले.

मा.कुलपती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कुलगुरुंच्या बैठकीत (J.B.V.C.) तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये उच्च शिक्षणाचा दर्जा व शिक्षणाच्या जागतिकीकरणाच्या स्पर्धा यासाठी योग्य ती पावले उचलण्यासाठी शासनाला व विद्यापीठाला आदेशित केले आहे.

सदर बाब शासनस्तरावरुन घेण्यात आलेल्या मा.कुलगुरु, कुलसचिव व प्राचार्य इत्यादींना वेळोवेळी अवगत करुन त्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत. तरीही विद्यापीठाकडून आवश्यक ती कार्यवाही पुर्ण झाल्याचे दिसून येत नाही.

अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राचार्य/ अध्यापक त्याचप्रमाणे अकृषि विद्यापीठांची पदे विहीत मुदतीत भरण्याबाबत वेळोवेळी कळविले आहे.

कार्यवाही न करणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द संबंधीत विद्यापीठांनी संदर्भ क्र.१ मधील शासन निर्णयातील क्र.८ (iii) याप्रमाणे करावी. विद्यापीठांच्या कुलगुरुंनी त्यांच्या नियंत्रणाखालील प्राचार्य / अध्यापक रिक्त पदांचा आढावा वेळावेळी घेणे आवश्यक आहे.

सर्व अकृषि व संलग्नित अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालयांमधील अध्यापकांची रिक्त पदे शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या विनियमनानुसार अर्हताप्राप्त (Qualified), मान्यताप्राप्त (Approved), नियमित (Regular) तत्वावर भरणे अनिवार्य आहे.

महाविद्यालयाच्या दैनंदिन प्रशासनाची जबाबदारी प्राचार्यांची असल्याने प्रशासकीय व गुणात्मक दर्जा वाढीसाठी प्राचार्य पदी अर्हताधारक नियमित प्राचार्य असणे अनिवार्य आहे. पूर्णवेळ

नियमित पद न भरल्याने विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठ, निधी देणारे प्राधिकरण यांचेमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीवरही परिणाम होत असल्याने एकूणच महाविद्यालयाचा संस्थात्मक विकासास बाधा निर्माण होते. त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत असल्याने उपरोक्त विषयाबाबत विद्यापीठाने आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल **१५ दिवसांत** या कार्यालयास सादर करावा.

(डॉ.विजय नारखेडे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १

प्रत :-

१) मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१ यांस माहितीस्तव सविनय सादर.

२) प्रभारी प्राचार्य / अतिरिक्त कार्यभार असलेले प्राचार्य, अशासकीय अनुदानित महाविद्यालये, पुणे/अहमदनगर/नाशिक.

२/- यांना निर्देशित करण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या व्यवस्थापन मंडळाच्या निदर्शनास आणावे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयाच्या jdhepune@gmail.com या ई-मेलवर **दि.१८ नोव्हेंबर, २०१५** पर्यंत निश्चितपणे सादर करावा.

Director BCUD Office
Savitribai Phule Pune University
In.Dt. 16 NOV 2015
Inward ..... 4309
Outward Date.: 17/11/15

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
फोन नं ०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ फॅक्स नं. ०२०/२६१२११५३

क्रमांक-अमवि/२०१५/प्राचार्यरिक्तपदे /मवि-२ दि.१०/११/२०१५

प्रति,

१.कुलसचिव, सर्व अकृषि विदयापीठे, महाराष्ट्र राज्य.
२.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

आवक क्र.आर/ 4667
दिनांक - 16/11/2015
जावक दिनांक - 16/11/15
विभाग - Dir BCUD

**विषय - प्राचार्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत.**

**संदर्भ - १. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक नियुक्ती-२०११/प्र.क्र.३४४/११/मशि-५, दिनांक १५/३/२०१२**
**२. संचालनालयाचे पत्रक्रमांक अमवि/२०१३/प्राचार्यपदे/मवि-२ व ३/३७१२, दिनांक १४/७/२०१३**
**३. संचालनालयाचे पत्रक्रमांक एनजीसी/परिपत्रक/मवि-२-३/४५८७, दिनांक २९/५/२०१४**

ACADEMIC SECTION
Savitribai Phule Pune University
Date 17 NOV 2015
Inward No. B462

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णय व पत्रांन्वये शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना अनुदानित महाविदयालयांमधील प्राचार्यांची रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत. तरीही प्राचार्यांची पदे रिक्त असल्याचे दिसून येत आहे.

या विषयाबाबत अधिवेशनामध्ये वारंवार तारांकित प्रश्न, कपात सूचना, लक्षवेधी सूचना, अतारांकित प्रश्न उपस्थित होतात. तरी आपल्या विभागातील शासकीय, अशासकीय अनुदानित व कायम विना अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी व अध्यापक महाविदयालयांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त असल्यास ती तात्काळ भरण्यात यावीत.

विभागीय सहसंचालक यांनी शासकीय, अशासकीय अनुदानित तसेच विदयापीठांनी कायम विना अनुदानित महाविदयालयांमधील प्राचार्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत संस्थाचालकास सूचना दयाव्यात. प्राचार्य पद नियमित भरणे आवश्यक आहे याची सकारण जाणीव करुन दयावी.

दर महिन्याला प्राचार्यांच्या भरलेल्या व रिक्त पदांचा आढावा घेण्यात यावा व त्याची एक प्रत संचालनालयास सादर करावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १.

प्रत, मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीसाठी सविनय सादर.